महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/विवि/२०२१/ १९९२

दिनांक २६/०४/२०२१

प्रति,

प्राचार्य,

अशासकीय विना अनुदानित तंत्र निकेतने/अभियांत्रिकी महाविद्यालये

सोलापूर जिल्हा

विषय : - कोविड १९ अंतर्गत प्रतिबंधात्मक उपाययोजना
तांत्रिक तपासणीसाठी खाजगी तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी महाविद्यालय मधील अधिव्याख्याते उपलब्ध होवून मिळणेबाबत.

संदर्भ :- जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे पत्र क्र.मशा/जिनिक/प्र.क्र.२४/२०२०/आर आर- ८२२/२०२१ दिनांक २४/०४/२०२१

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. त्यानुसार सदस्य सचिव जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी असे कळविले आहे की, सोलापूर जिल्हामध्ये कोविड १९ या संसर्गजन्य साथरोगाचा प्रादुर्भाव टाळणेसाठी जिल्हामधील ८० ते ९० कोविड हॉस्पीटलच्या इमारतीची संरचनात्मक तपासणी, हॉस्पीटल मधील ऑक्सिजन पुरवठा प्रणाली तसेच इमारतीमधील अग्निशमन यंत्रणा इ. बाबींमध्ये कोणत्याही प्रकारची दुर्घटना होवू नये याकरीता तांत्रिक तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. करीता याकामी आपल्या संस्थेतील अधिव्याख्याता यांच्या सेवा तात्काळ उपलब्ध करून मिळणेबाबत कळविले आहे.

करीता उपरोक्त नमुद बाबींचे अनुषंगाने तांत्रिक तपासणी करणेकामी आपल्या संस्थेतील अधिव्याख्याता यांच्या सेवा तात्काळ उपलब्ध करून मिळावेत. यासाठी आपल्या संस्थेतील अधिव्याख्यातांची यादी प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, सोलापूर यांना तात्काळ खालील नमुन्यात उपलब्ध करून देण्यात यावी. यात कोणत्याही अधिव्याख्यांताचे नांव सुटणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबत काही माहिती आवश्यक असल्यास प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन सोलापूर यांचेशी संपर्क करावा त्यांचा मोबाईल क्रमांक ८४०७९ ९९९८४

| अधिव्ख्यातांचे नांव | विभाग | जन्मदिनांक | मोबाईल क्रमांक | ईमेल |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

\Desktop\bhilave.docx